सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/३५६/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक :

क्रमांक: १०/पदविका-मा.प्र./ Intake Approval/मुदतवाढ/२०२६/३२४ दिनांक: ०२ जुलै २०२६

प्रति,
प्राचार्य,
पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ : १. संचालनालयाचे परिपत्रक क्र. १०/एडीएम/Intake Approval/२०२६/२०१, दि.२५.०५.२०२६
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र. १०/एडीएम/Intake Approval/२०२६/३०६, दि.२२.०६.२०२६

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद अशा शिखर परिषदांद्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असुन पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना या शिखर परिषदांद्वारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता /समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि. २२ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये निर्देशित करण्यात आले होते. त्यास संदर्भ क्र.०२ च्या परिपत्रकान्वये दि.०२.०७.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. अद्यापही काही संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने, आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता /समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि.०८ जुलै २०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर सादर करावी. कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत करणे प्रलंबित राहिल्यास व त्यामुळे संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. तसेच, मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

(डॉ. प्रमोद नाईक)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : १) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांना कळविण्यात येते की, संलग्नता समकक्षता प्रदान करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही विहीत कालमर्यादेत करावी. तसेच, मंडळाकडुन संलग्नता प्रदान केलेल्या संस्थांची माहिती संचालनालयास दि.०८ जुलै २०२६ दुपारी ०६.०० वाजेपर्यंत सादर करावी.

२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे यांना कळविणेत येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या अधिनस्त सर्व पदविका संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.०८ जुलै २०२६ सायं ०६.०० पर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करत आहेत.

३) का. क. ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.